REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# एल.पी.जी. (खाउजा) मूळे भारत गरीबातला गरीब बनला व श्रीमंताचा अती श्रीमंत झाला !

डॉ. सुभाष राठोड
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण.

**प्रस्तावना :-**

वास्को दी गामा हा पोर्तुगालच्या टोळीचा डॉन होता ! तो भारतास लुटण्यास आला होता. कोलंबंस हा स्पेशनच्या टोळीचा डॉन होता. पोर्तुगाल हा भारतास लुटण्यास आला होता. 14 व्या शतकात युरोप अगदी भिकारी होता. वास्को 1498 मध्ये भारताच्या कालिकत बंदरात उतरला. वास्को ने कालिकतचा राजा याची हत्या करुन बंदराचा ताबा घेतला. त्याने बंदरात येणाऱ्या जहाजाकडून कर वसूली चालू केली. भारताला तीन वेळा लूटण्याचा प्रयत्न केला आणि भारतातून 60, 12 व 22 एवढी जहाजे भरुन सोने लूटून घेवून गेला.[1]

भारताला पोर्तुगालने भारतात 70 वर्षांपर्यंत लूटले. फ्रान्सने भारताला 80 वर्ष पर्यंत लूटले आणि इंग्रजांनी 150 वर्ष लूटले. क्लाईव्हेने कोलकात्यातून बंगालवर 7 वर्षे राज्य केले. पण जेव्हा तो, इंग्लंडला परत गेला, तेव्हा त्याने 900 जहाजे भरुन सोने, चांदी आणि हिऱ्याचे नग दागिणे घेवून गेले. भारत स्वातंत्र्य नंतर इस्ट इंडिया कंपनी गेली. पण इंग्रजांच्या 126 कंपन्या सरकारने भारतात राहू दिले. ब्रुक बॉण्ड, लिप्टन कंपनी, ब्रिटानिया कंपनी, कोलमन कंपनी, (टाईल्स ऑफ इंडिया-मालक) इत्यादी अनेक कंपन्या आहेत.

सन-1996 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री डॉ.मनमोहनसींग यांनी एल.पी.जी. याची खूप प्रशंसा केली. कोरीयाच्या सगळ्या खाजगी कंपन्या अमेरीकेच्या मालकीच्या झाल्या. हुंडाई ही कोरियाची सर्वांत मोठी कंपनी अमेरिकन 'जनरल मोटर्स' च्या मालकीची झाली. कोरीयाच्या 100 कंपन्या व त्यांचे कामगार अमेरीकन मालकीचे झाले आहे. आता कोरीयाचे प्रेसिडेन्ट म्हणतात. एल.पी.जी. चा कार्यक्रम हा तेथील लोकांचा आर्थिक दहशतवादाचा कार्यक्रम आहे. उदा. इंडोनेशीया : या देशात 45 वर्षांपासून एक स्थिर सरकार होता. मागील 35 वर्षांपासून तीच व्यक्ती देशाचा अध्यक्ष आहे. सन-1986 मध्ये अध्यक्षाने एल.पी.जी. लागू केला. वर्ल्ड बँकेने सॅप (SAP) नावाचे निर्बंध या देशावर लावले.

परिणामतः **इंडोनेशीया :** 1 डॉलर = 40/- रुपये या भावाने द्यावयाचा तो आता 20 वर्षांनी 1 डॉलर = 17000/- रुपया एवढा लहान झाला आहे. आता प्रेसिडन्ट म्हणत आहे. एल.पी.जी. स्विकारुन फार मोठी चूक झाली आहे.

**ब्राझील :** या देशाने एल.पी.जी. कार्यक्रमाची अंमलबजावणी सन-1988 मध्ये सुरु केली. 7 वर्षांत ब्राझील पूर्णतः कोसळला. त्यानंतर 'लूला डी सिल्व्हा' एक कारखान्यातील कामगार देशभर फिरला. त्याने लोकांना एल.पी.जी. च्या कार्यक्रमाने देशाची कशी दुर्दशा केली हे समजावून सांगितले. त्याने स्वतः ब्राझीलच्या अध्यक्षाची निवडणूक लढून विजय मिळविला. IMF (आय.एम.एफ.) वर्ल्ड बँकेला आव्हान दिले की, ब्राझील ने घेतलेल्या कर्जाच्या 3 पट रक्कम व्याजापोटी परतफेड करण्यात येईल, त्या अध्यक्षाने केली. ब्राझील कर्ज मुक्त झाला. आता वर्ल्ड बँकेकडून कर्ज घेण्यास नाकारले. ब्राझील मधील सर्व परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांना देशातून बाहेर हाकलून दिले. त्याने त्यांच्या देशाच्या नाण्याचे अवमुल्यनही नाकारले आणि परदेशी चलनाच्या 1 डॉलर = 1/- रुपया अदा झाला. केवळ तीन वर्षांत ब्राझीलची अर्थव्यवस्था भरभराटीला आली, त्याने अमेरीकेलाच युध्दाचे आव्हान दिले. ब्राझीलची अर्थव्यवस्थेचा नंबर चीननंतर लागतो.[2]

## एल.पी.जी. मुळे भारतीय अर्थव्यवस्था समाप्तीच्या मार्गावर

भारताने सन-1991 मध्ये खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (एल.पी.जी.) अंमलबजावणी केली. सन-1991 मध्ये परकीय चलनाचा साठा 8 बिलियन होता तो सन-1997 मध्ये 36 बिलियन डॉलर झाले. भारताची निर्यात वाढली म्हणून नाही तर परदेशातून भारताच्या शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्याकरिता आलेले परकीय चलनाचे प्रमाण वाढल्यामुळे झाली होती.




1991 मध्ये 1 डॉलर = 18/- रु.
1997 मध्ये 1 डॉलर = 38/- रु.

2012 मध्ये 1 डॉलर = 56/- रु.
2015 मध्ये 1 डॉलर = 63/- रु.
2018 मध्ये 1 डॉलर = 72.61/- रु.
ब्रिटीश = 1 पाऊंड - 94/- रु.
1966 मध्ये 1 डॉलर = 7.5/- रु.
ब्रिटीश = 1 पाऊंड - 13/- रु.

अर्थव्यवस्था सुधारण्याकरीता भारतीयांनी स्वत: परदेशी कंपन्या भारतातून हाकलून देणे एकमेव पर्याय आहे. त्यांचा मालक खरेदी करण्याच्या ऐवजी त्यांच्या बदलीत आपला माल म्हणजेच देशी माल वापरला पाहिजे. परंतू उच्च वर्गीय हे विदेशी युरेशीयन ब्राम्हण आहेत त्यांचे अनुकरण जनता करत आहे. एल.पी.जी. चा कार्यक्रम बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विकासासाठी आहे. भारतातील अथवा जगातील गरीबासाठी नाही हे स्पष्ट लक्षात येत आहे.

## 1) खाजगीकरण (Privatisation) :-

सरकारी संविधानीक संस्था संपुष्टात आणणे म्हणजे खाजगीकरण होय. भारत देशात ज्या सरकारी संस्था आहे त्याचे खाजगीकरण करणे म्हणजे नफेखोरी करणाऱ्या भांडवलदारास विक्री करुन भांडवलशाही मजबूत करण्यासाठी खाजगीकरणाची सुरुवात मोठ्या प्रमाणात सुरु झालेली आहे. भारतीय लोकशाहीने समाजवाद आणि भांडवलवाद या दोन अर्थव्यवस्थेला पूर्णत: न स्विकारता तिसरी अर्थव्यवस्था स्विकारली आहे ती म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय. भारतीय संविधानाच्या प्रस्ताव घेत समाजवादी अर्थव्यवस्था लागू करण्याचा संकल्प केला होता. भारतीय समाज जिवनाचा सखोल अभ्यास करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर **"भांडवलशाही व ब्राम्हणशाही"** हे या देशाचे मुख्य दोन शत्रू आहेत.[3] खाजगीकरण झाले म्हणजे आरक्षण नाही याचा अर्थ एन.टी., एस.टी., ओ.बी.सी. यांना शासन प्रशासनामध्ये पर्यांप्त प्रतिनिधीला नाही. खाजगी करणाच्या माध्यमाने भांडवलशाही अती श्रीमंत होत आसताना दिसून येते.

## 2) उदारीकरण (Liberalization) :-

उदारीकरण म्हणजे उदार असणे, भारत सरकारचे जे कडक नियम असतात ते शिथील करणे, भारत देशातील उद्योगपती यांना जे अडथळे निर्माण होत होते ते उदारीकरणामुळे असणार नाहीत. उदारीकरण म्हणजे जी सरकारी वस्तू तसेच ज्या संस्था आहे, म्हणजेच भारत सरकारने निर्माण केलेली जनतेच्या कल्याणासाठी ती भव्य-दिव्य वास्तू सरकारची खैरात मोठ्या प्रमाणात वाटून त्यांचे कर्ज देखील माफ करत आहेत. भारताच्या अर्थसंकल्पामध्ये भरघोष तरतूद करुन सर्वसामान्य जनतेला लाचार बनविणारी निती तयार करण्यात आली आहे. म्हणजे उदारीकरणामुळे महागाई बेरोजगारी, आत्महत्या, दारीद्र्य रेषेखालील जनतेत वाढ 83 कोटी जनता जनता भूकबळी, अर्धभूकबळी अशा बाबतीत शिकार झालेले दिसत आहेत.

भारतामध्ये 40,000 बहुराष्ट्रीय कंपन्या आलेल्या आहेत.[4] प्रगत राष्ट्राच्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येवू द्यायच्या की नाही हे उदारीकरण ठरवत असते. बहुराष्ट्रीय कंपन्या शासन प्रशासनातील कायदे मोडीत काढण्याचे प्रयत्न करताना दिसत आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्था ही कंपनीराज व भांडवलराज निर्माण करण्याचे प्रयत्न बहुराष्ट्रीय कंपन्या करत आहेत. भारताच्या सरकारी धोरणात उद्योगपतीच्या प्रभावात वाढ होताना दिसत आहे. भारताची आर्थिक सत्ता बहुराष्ट्रीय कंपन्याकडे सुपूर्द करणारी यंत्रणा तयार होताना दिसत आहे.[5] उदारीकरणाच्या माध्यमाने देशात जेव्हा अर्थमंत्री पी. चिदंबरम असतांना अमेरीकेला गेले आणि तेथे उद्योगपतीना संबोधित करतांना उदारीकरणाच्या माध्यमाने भारतात जावून 3 कोटी रुपये काळे धन काढण्यासाठी चिदंबरमने योजना बनवली. योजनेला समजण्यापूर्वी काळे धन कसे होते, सामान्यपणे जे उद्योगपती आपले उत्पादन विक्री करुन त्याचा नफा मिळतो, त्यातून काही भाग टॅक्सच्या रुपाने सरकारला द्यावा लागतो. त्याचीच उद्योगपती चोरी करतो, म्हणजेच उद्योगपती टॅक्सची चोरी करतो, त्याला काळेधन म्हणतात. त्याचा हिशोब आपल्या खातेवहीत ठेवत नाही. कारण नफ्याचा उल्लेख केला तर व्यक्तीचे उत्पन्न किती आहे हे माहित होईल. जो पैसा उपयोग करायचा पण खातेवहीत लिहायचा नाही यालाच काळा पैसा म्हणता.[6] टॅक्सच्या रुपाने उद्योगपतीकडून जो पैसा घेतला जातो त्याचा उपयोग देशाच्या विकासासाठी केला जातो.

काळा पैसा बाहेर काढण्यासाठी पी. चिदंबरमने उदारीकरणाच्या माध्यमाने एक योजना आखली. जर एखाद्या उद्योगपतीजवळ काळा पैसा आहे तो उद्योगपती एक रुपयातील केवळ तीस पैसे सरकारला देतील आणि सत्तर पैसे आपल्या जवळ ठेवतील. एखाद्या उद्योगपतीजवळ एक हजार कोटी रुपये काळा पैसा असेल तर तीनशे कोटी रुपये सरकारला द्यायचे आणि 700 कोटी रुपये आपल्याजवळ ठेवायचे जो उद्योगपती घोषीत करेल त्याला भारत सरकार एक प्रमाणपत्र देईल. कालपर्यंत जो 700 कोटी रुपये काळा पैसा होता ते आज पांढरा होईल हे उदारीकरणाचे उदाहरण आहे.

### 3) जागतीकीकरण (Globalization) :-

जागतीकीकरण हे विकसीत देशासाठी फायदेशीर आहे. परंतू अर्थविकसीत व विकसनशील देशांना जागतीकीकरण परवडणारे नाही. तरी देखील जागतीकीकरणाच्या माध्यमातून विकसीत देश मोठी ग्राहक शोधत आहे. भारतातील बाजारपेठ जेथे उत्पादनाचे साधने कमी आहेत व कच्चा माल मोठ्या स्वरुपात आहे. परंतू भारत ही असंतुष्ट अर्थव्यवस्था आहे. जागतीकीकरणाने कोणत्याही देशात जावून बाजारपेठ मिळविता येते. म्हणजेच आयात-निर्यात वरील बंधने हटविण्यात आले आहे.

WTO च्या माध्यमाने 147 सदस्य राष्ट्र या सदस्य देशांना आपला व्यापार मुक्त हस्ते करावा. आयात-निर्यातीवरील बंधने हटविण्यात आली. विदेशी मालाला आडवता येणार नाही. उदा. भारत देश गव्हाचे उत्पादन विदेशात निर्यात केले जाते. परंतू जर विदेशातील गहू भारतात आयात होत असेल तर गव्हामध्ये स्वयंपूर्ण असून देखील गव्हाची आयात थांबवता येत नाही. म्हणजेच आयातीवरील निर्बंध नाहीत. कारण कुठलाही देश निर्यात वाढविण्यासाठी आणि आयात कमी करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यातून परकीय गंगाजळी, विदेशी चलनसाठा वाढत असतो. त्यामुळे देशाचे उत्पन्न वाढते. जागतीकीकरण धोरणाच्या माध्यमाने आयात जबरदस्तीने लादण्यात येत आहे. अन्यथा जागतीक बँकेकडून कर्ज मिळणार नाही. नफाखोरीसाठी सध्या आवश्यक नसणाऱ्या वस्तू देखील मोठ्या प्रमाणात आयात करण्यात येत आहे. त्यामुळे भारतीय व्यापार धोक्यात आहे.

**भारताचा विदेशी व्यापार (करोडो रुपयांमध्ये)**

| वर्ष | निर्यात | आयात | व्यापारातील तोटा |
|---|---|---|---|
| 1950-1951 | 606 | 608 | -2 |
| 1970-1971 | 1,535 | 1634 | -99 |
| 1972-1973 | 1,971 | 1,867 | +104 |
| 1976-1977 | 5,142 | 5,074 | +68 |
| 2002-2003 | 2,55,137 | 2,97,206 | -42069 |
| 2003-2004 | 2,91,582 | 3,53,976 | -62394 |

वरील आकडेवारीत व्यापारातील तोटा सतत वाढताना दिसून येत आहे. वरील आकडेवारीत सतत तोटा वाढतांना दिसून येत आहे. हा परीणाम जागतिकीकरणाचा आहे.

### निष्कर्ष :-

समाजवादी अर्थव्यवस्था होती. सरकार समाजधीस्टीत अर्थव्यवस्था राबविण्याचा कल होता. परंतू सन-1991 चा धोरणाने भारतात समाजवाद अर्थव्यवस्था संपुष्टात आणून उद्योगपती भांडवलदार मुठभर लोकांचे हितसंवर्धन करणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणण्याचा प्रयत्न चालू आहे. एल.पी.जी. याचा परिणाम (अर्जुनसेन गुप्ता रिपोर्ट) भारतात 121 कोटी लोकसंख्या जनगणना-2011 नूसार त्यापैकी भारतात 83 कोटी लोक भुकबळीच्या कगारावर आहेत. त्यांचे दरडोई उत्पन्न रु.20/- आहे. आज भारतात मागील 10 वर्षांत एक लाखापेक्षा पेक्षा जास्त शेतकऱ्यांने आत्महत्या केलेल्या आहेत. भारतात 12 कोटी लोक सुशिक्षीत बेरोजगार आहेत. साडेसात कोटी बालके गिरणी कामगार आहेत. गरीब देशाच्या यादीत भारत 134 व्या क्रमांकावर आहे. सन-1991 पर्यंत एकही अब्जाधीश या खरबपती नव्हता. सन-1991 च्या धोरणामुळे सन-2008 पर्यंत 56 खरबपती आहेत.[7] तसेच भारतीय विद्यापीठाचा दर्जा निकृष्ठ ठरवण्यात आला. ओ.बी.सी. यांची जातीनिहाय जनगणना करण्यात या बाबींवर पडदा टाकण्यात आले.

एल.पी.जी. (खाउजा) च्या माध्यमाने 25 वर्षांपासून एल.पी.जी. लागू आहे. पण त्यामुळे भांडवलशाहीमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे तसेच उद्योगपती हा अरबपती बनला आहे व गरीब अति गरीब दारीद्र्य अवस्थेत जीवन जगत आहे.

### संदर्भ :-

1. भारत विकला देशी परदेशी कंपन्यांना सरकारी उद्योगांचे खाजगीकरण : अनुवाद पु.श्री. सदार, प्रकाशक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, न्यू दिल्ली-110005, लेखक : बी.एस. बळीराव, पान क्र.19.
2. भारत विकला देशी परदेशी कंपन्यांना सरकारी उद्योगांचे खाजगीकरण : अनुवाद पु.श्री. सदार, प्रकाशक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, न्यू दिल्ली-110005, लेखक : बी.एस. बळीराव, पान क्र.211.
3. भारतातील अर्थव्यवस्था, लेखक : प्रा.भारत पगारे, प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशवनगर, मुंढवा, पुणे, पान क्र.18.
4. भारतातील अर्थव्यवस्था, लेखक : प्रा.भारत पगारे, प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशवनगर, मुंढवा, पुणे, पान क्र.20.
5. भारतातील अर्थव्यवस्था, लेखक : प्रा.भारत पगारे, प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशवनगर, मुंढवा, पुणे, पान क्र.20.

6. एल.पी.जी. (भारताला गुलाम बनविण्याचा कार्यक्रम), लेखक : वामन मेश्राम, प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे, पहिली आवृत्ती : 22 मे-2011, पान क्र.22.
7. भारतातील अर्थव्यवस्था, लेखक : प्रा.भारत पगारे, प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशवनगर, मुंढवा, पुणे, पान क्र.26.